# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
# (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.128/२०२०

**विषय :** **Easing of Restrictions and Phase-wise Opening of Lockdown. (MISSION BEGINS AGAIN)**

**संदर्भ :** 1.Government of Maharashtra, Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilation, Mantralaya, Mumbai ORDER No. DMU/2020/CR.92/DisM-1, Dated: 31 th May 2020.

2. DHE/2020/Corona/ MV-1 Dated: 02nd June 2020.

3. परिपत्रक क्र. १०६/२०२०, जा.क्र.एएन/१६९८, दिनांक ०२ जून, २०२०

उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये परीक्षांचे निकाल, आगामी शैक्षणिक वर्षाची तयारी, अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रीया, विद्यार्थ्यांच्या हिताशी संबंधित शिष्यवृत्ती/छात्रवृत्ती इत्यादी बाबी तसेच आगामी काळासाठी ई-कन्टेंट तयार करणे आदी महत्वपूर्ण कामकाजासाठी तसेच प्रदिर्घकाळ कार्यालये जवळपास बंद असल्याने प्रलंबित कामांचा काही प्रमाणात निपटारा करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती दक्षता घेऊन विद्यापीठाची विविध प्रशासकीय व शैक्षणिक कार्यालये टप्याटप्याने काही प्रमाणात सुरु करण्यात आलेली आहेत. त्यानुसार दिनांक ०३ जून, २०२० पासून विद्यापीठाच्या आवारातील ५० प्रशासकीय कार्यालये, ६२ शैक्षणिक विभागातील कार्यालये तसेच नाशिक व अहमदनगर येथील उपकेंद्र हे नियमित सुरु करण्यात आलेली आहेत. या कालावधीत संविधानिक अधिकारी, शैक्षणिक/प्रशासकीय विभागप्रमुख/शाखाप्रमुख, तसेच गट-अ/गट-ब मधील सर्व अधिकारी तसेच गट-ड मधील सर्व सेवक रजेवर असल्याखेरीज नियमितपणे उपस्थित राहण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. याव्यतिरिक्त शिक्षक तसेच सेवकांच्या उपस्थितीबाबत व इतर बाबींसंदर्भात प्राप्त आदेशानुसार दिनांक १७ जून, २०२० पासून कार्यालयातील उपस्थितीबाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत :

१. प्रत्येक शैक्षणिक विभागातील / प्रशासकीय शाखेमधील वर्ग ३ व वर्ग ४ मधील एकुण सेवक संख्या अथवा १५ सेवक यापैकी जे कमी असेल एवढया सेवकांना कार्यालयात बोलविण्यात यावे. ज्या विभागातील वर्ग ३ व वर्ग ४ मधील एकूण संख्या १५ पेक्षा अधिक आहे त्या विभागांनी आवश्यकतेनुसार किमान १५ सेवकांस आळीपाळीने (Rotation) कार्यालयात बोलावून कार्यालयीन कामकाज करुन घेण्यात यावे. अशाप्रकारे ज्या कर्मचा-यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळेल, त्यांनी घरी राहून (Work From Home) कार्यालयीन काम करावे.

२. शैक्षणिक विभागातील शिक्षकांची एकूण संख्या अथवा १५ शिक्षक यापैकी जे कमी असेल एवढया शिक्षकांनी विभागामध्ये उपस्थित रहावे.

३. शैक्षणिक विभागातील संशोधकांना आवश्यकतेनुसार उपस्थित राहण्याची परवानगी विभागप्रमुखांनी द्यावी.

४. प्रतिबंधित क्षेत्रातील (Containment Zones) तसेच रजेवर (अर्जित/परिवर्तीत/अर्धपगारी/विनावेतन) असणारे सेवक वगळता इतर सेवक कोणत्याही कारणाने विभागात अनुपस्थित राहील्यास त्यांची अनुपस्थित अनुज्ञेय/ विनावेतन रजा म्हणून नियमीत करण्यात येईल. आळीपाळीने बोलवलेला सेवक परवानगी न घेता अनुपस्थित राहील्यास त्याची त्या संपूर्ण आठवडयाची अनुपस्थिती गृहित धरुन अनुज्ञेय/ विनावेतन रजा म्हणून नियमित करण्यात येईल.

५. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक समय २०२०/प्र.क्र.३५/१८(र.वका.), दिनांक ११ जून, २०२० नुसार लॉकडाऊनच्या कालावधीत दिव्यांग अधिकारी/सेवकांना कार्यालयात उपस्थित राहण्याची सक्ती करु नये. अशाप्रकारे विभागात अनुपस्थित असणा-या शिक्षक व अधिकारी/सेवकांचा अनुपस्थितीचा अहवाल प्रशासन शिक्षक/ प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडे सादर करावा.

६. सर्व विभागप्रमुख /शाखाप्रमुख यांनी त्यांच्या कार्यालयातील अधिकारी / सेवकांची उपस्थिती नियंत्रित करावी तसेच जे अधिकारी / सेवक यांनी लॉकडाऊनच्या कालावधीत विनापरवानगी मुख्यालय सोडले आहे त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत त्यांची नावे प्रशासन शिक्षक / प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडे कळवावीत, जेणेकरुन याबाबत पुढील कार्यवाही करता येईल. कोणीही कार्यालयास पूर्वसूचना न देता मुख्यालय सोडू नये.

७. कोरोना आजाराच्या पार्श्वभुमीवर माहे मे, २०२० व जून, २०२० या कालावधीतील अतिकालीक देयके तुर्तास बायोमॅट्रिक नोंदणीच्या अहवालानुसार न करता पूर्वीप्रमाणे अदा करण्याबाबत हरकत नाही. तथापि, सदर देयके प्रशासन शिक्षकेत्तर कक्षामार्फत वित्त विभागास सादर करावीत.

८. सद्य परिस्थितीत संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने लॉकडाऊनच्या कालावधीत बायोमॅट्रिक हजेरी प्रणालीच्या Face Recognition System चा वापर करावा तसेच आपल्या येण्याजाण्याच्या वेळेची नोंद ऑनलाईन तपासून सदर नोंदीबाबत काही त्रूटी असल्यास त्याबाबत त्वरीत प्रशासन शिक्षक/ प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडे कळवावे.

९. सदर आदेश विद्यापीठ कार्यालयातील निम प्रशिक्षणार्थी, ईपीपी प्रशिक्षणार्थी, एकत्रित वेतनावरील सेवक इत्यादींना देखील लागू राहतील.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/ 1816
दिनाकं : 16 JUN 2020

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग

} आपणास विनंती की, सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.